# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** पठारी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0098 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/02/2025 00:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 27/02/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/02/2025
**Time From (वेळेपासून):** 13:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/02/2025 **Time (वेळ):** 00:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/02/2025 00:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती,पाथरी परिसर,पाथरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विलास भगवानराव सत्वधर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | झरी ,ता पाथरी ,मानवत,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | झरी ,ता पाथरी ,मानवत,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9673737747

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ईश्वर बाळु पवार | | | 1. रा तिवासपाडा पोस्ट साखरे , विक्रमगड ,विक्रमगड,पालघर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | गोवर्धन मधुकर बडे | | | 1. रा केकरजवळा, ,पैठण ,पैठण, छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 70नोटा | 35,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

35,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी विलास भगवानराव सत्वधर, वय 38 वर्षे, व्यवसाय- ग्रामरोजगार सहायक, ग्रामपंचायत कार्यालय, झरी ता. पाथरी रा. झरी, ता. पाथरी जि. परभणी मो. क्र. 9673737747

मी आज रोजी फिर्याद देतो की, दिनांक 27/02/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी येथे तक्रार दिली की, मी ग्रामपंचायत झरी येथे ग्रामरोजगार सहायक म्हणुन 2015 पासुन कामास आहे. माझे काम ग्रामपंचायत मध्ये सिंचन विहीर, गायगोठा, वृक्षलागवड बाबतचे दाखल झालेले प्रस्ताव पंचायत समितीमध्ये दाखल करणे व मंजुरी करीता पाठपुरावा करणे आहे. दिनांक 30/01/2025 रोजी मी पंचायत समिती पाथरी येथील बीडीओ पवार यांना आमचे गावातील लोकांचे 7 विहीरीचे वर्क ऑर्डरवर सही करण्यासाठी भेटलो होतो. त्यावेळी बीडीओ पवार साहेबांनी मला किती फाईल आहेत? काय आहे ते करुन टाका? असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना सात फाईल आहेत. ते लोक गरीब आहेत, सहया करुन टाका असे म्हणालो. त्यावर बीडीओ पवार साहेबांनी प्रत्येकी 5,000/- रुपये प्रमाणे सात फाईलचे 35,000/- रुपयाची मागणी केली.

माझे कडे असलेले विहीरीचे कामाचे फाईलवर सही घेण्यासाठी मी त्यांना आजच दिनांक 27/02/2025 रोजी भेटण्यास जाणार आहे. सदर भेटी दरम्यान त्यांनी विहीरीच्या वर्क ऑर्डरवर सही करण्यासाठी स्वतः अगर इतर कोणामार्फत लाचेची मागणी करुन स्विकारल्यास त्यांचेविरुध्द रितसर कार्यवाही करण्यात यावी अषी तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन डीवायएसपी इप्पर साहेबांनी पोनि मुलाणी यांना पुढील कार्यवाही करण्यास सांगितले. त्यावरुन पोनि मुलाणी साहेब यांनी माझी लेखी तक्रार घेवुन मला पाथरी येथे जाण्याच्या सुचना केल्या आणि ते पंचांना घेवुन पाथरी येथे येत असल्याचे सांगितले.

मी दिलेल्या तक्रारीवरुन पोनि मुलाणी साहेब यांनी सापळा पथक व दोन पंचासह पाथरी येथे आले. त्यानंतर पोनि मुलाणी यांनी ते थांबलेल्या ठिकाणी मला बोलावुन घेतले. तेथे गेल्यानंतर मला मृद व जलसंधारण विभाग, परभणी येथील दोन शासकीय पंच म्हणुन किशोर गोंगे व प्रशांत राठोड यांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी त्यांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगितली. त्यानंतर माझे लेखी तक्रारीवर पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पोनि श्री मुलाणी यांनी पडताळणी कार्यवाही बाबतच्या आम्हाला सुचना दिल्या. तसेच सापळा पथकातील सपोउपनि/निलपत्रेवार यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये वक्तव्य रेकार्ड केले. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने 13.35 वाजता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन पंच क्र 1 किशोर गोंगे यांचे सोबत पडताळणी कार्यवाही करण्याकरीता पाठविण्यात आले. सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान पंचायत समिती, पाथरी येथे बीडीओ पवार साहेब हजर नव्हते. त्यामुळे मी व पंच क्र 1 गोंगे बीडीओ पवार साहेब यांचे षासकीय निवासस्थानी गेलो. तेथे बीडीओ पवार साहेब यांना संशय आल्याने त्यांनी पंच क्र 1 गोंगे यांना बाहेर पाठविण्यास सांगितले.त्यानंतर बीडीओ पवार साहेब यांना ग्रामपंचायत झरी येथील गावातील लोकांचे सिंचन विहीरीचे वर्क ऑर्डरवर सही करण्यांसाठी पाठपुरावा केला.त्यावेळी बीडीओ पवार साहेबांनी प्रत्येक फाईलचे 5 प्रमाणे म्हणजेच 7 फाईलचे साता पाचा पस्तीस असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना 35,000/- रुपये का ? असे विचारले. त्यावेळी बीडीओ पवार यांनी "हु" म्हणुन 35,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदरचे रेकार्ड झालेले संभाषण सापळा पथक व पंचांनी ऐकले. त्यावरुन सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर बीडीओ पवार यांचेवर सापळा कार्यवाही करणे असल्याने मी माझेकडील 35,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे नंबर पंच क्र 2 प्रशांत राठोड यांनी को-या कागदावर लिहुन त्यांचे खिशात ठेवला.सापळा पथकातील

अंमलदार पोशि/नागरगोजे यांनी मला व पंचांना अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायेलेट लॅम्प बाबत माहिती दिली. त्यावरुन अँथ्रासिन पावडर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशांत हिरवट चकाकी दिसुन येत असल्याचे समजले.तसेच मी दिलेल्या 35,000/- रुपये ज्यात 500/- रुपये दराच्या 70 नोटा होत्या.सदर नोटांना पोशि/नागरगोजे यांनी अँथ्रासिन पावडर लावुन माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवल्या.

त्यानंतर मला व पंच क्र 1 गोंगे यांना पंचायत समिती, पाथरी येथे 15.14 वाजण्याचे सुमारास सापळा कार्यवाहीसाठी पाठविले. आणि सापळा पथक त्यांचे वाहनाने आमचे मागे आले. पंचायत समिती, पाथरी तेथे बीडीओ पवार साहेब यांची व्हिडीओ कॉन्फरन्सीग चालु असल्याने बराच वेळ पंचायत समितीचे आवारातच आम्ही थांबलो. व्हिडीओ कॉन्फरन्सीग संपल्यानंतर काही वेळाने बीडीओ पवार साहेब यांनी त्यांचे कॅबीन मध्ये बोलावुन घेतले. तेथे सिंचन विहीरीचे वर्क ऑर्डरवर सही करण्याबाबत चर्चा केली आणि ते स्वतः उठुन सहायक बीडीओ यांचे कॅबीनमध्ये निघुन गेले. काही वेळाने एपीओ ( सहायक कार्यक्रम अधिकारी ) गोवर्धन बडे हे मी थांबलेल्या पवार साहेबांच्या कॅबीनमध्ये आले. त्यावेळी एपीओ गोवर्धन बडे यांनी त्यांचेकडे लाच रक्कम देण्यास बीडीओ पवार साहेब यांनी सांगितले आहे असे म्हणाले.त्यामुळे मी बीडीओ पवार साहेब यांनी लाच मागणी केलेले 35,000/- रुपये एपीओ गोवर्धन बडे यांचेकडे दिले.सदरची लाच रक्कम एपीओ गोवर्धन बडे यांनी स्विकारुन त्यांचे शर्टचे डावे बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन हातातील घडी काढुन लाच स्विकारल्याचा इशारा केला.त्यानंतर संपुर्ण सापळा पथकाने पंचायत समिती, पाथरी येथे येवुन बीडीओ पवार व एपीओ बडे यांना ताब्यात घेतले. दोन्ही पंचासमक्ष बडे यांचे शर्टचे डावे बाजुचे खिशाची पाहणी केली असता अँथ्रासिन पावडर असलेली मी दिलेली लाच रक्कम आढळुन आली. त्यानंतर सापळा पथकाने पुढील कार्यवाही केली.

दिनांक 27/02/2025 रोजी 13.35 ते 18.19 दरम्यान पंचायत समिती,पाथरी परिसरात करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान ईश्वर बाळु पवार वय 56 वर्षे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी रा.तिवासपाडा पोस्ट साखरे ता.विक्रमगड जि.पालघर यांनी मला झरी ग्रामपंचायत येथील लोकांच्या 7 सिचंन विहीरीचे वर्क ऑर्डरवर सही करण्यासाठी 35,000/- रुपये लाचेची मागणी केली.गोवर्धन मधुकर बडे वय 30 वर्षे, सहायक कार्यक्रम अधिकारी, पंचायत समिती, पाथरी रा. केकरजवळा, पैठण जि.छत्रपती संभाजी नगर यांनी लाच रक्कम 35,000/- रुपये बीडीओ ईश्वर पवार यांचे सांगणेवरुन माझेकडे मागणी करुन स्वतः स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली. त्याची प्रिंट काढुन मला वाचावयास दिली. ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर वं खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Jagdish Shivaji Mandalwar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पायरी.जि

एक प्रत मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Jagdish Shivaji Manc
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):